# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय** :- नामकरण ठराव क्र.५१०दि.०६/०९/२०२४ मधील अ.क्र.३ मधील नामकरण नावामध्ये दुरुस्ती करणेबाबत..

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर येथील साईनाथ ट्रान्सपोर्ट ते अखिल पद्मशाली हॉल पर्यंत मार्गास माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग या नाकरणास अ.क्र.३ अन्वये ठराव क्र.५१० दि.०६/०९/२०२४ अन्वये मान्यता प्राप्त झाली होती. मंजूर ठरावामधील प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर येथील साईनाथ ट्रान्सपोर्ट ते अखिल पद्मशाली हॉल पर्यंत मार्गास माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग असा नामकरण ठराव मंजूर करण्यात आलेला होता. मा.श्री.संतोष एम.शेट्टी, माजी नगरसेवक यांनी दि.०६/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अ.क्र.३ च्या नामरण ठरावामध्ये **माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग** ऐवजी **माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा चौक** या प्रमाणे नामकरण ठरावामध्ये दुरुस्ती करणेकामी सुचविले आहे.

| अ.क्र. | नामकरणाचे ठिकाण | नामकरणाचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर येथील साईनाथ ट्रान्सपोर्ट ते आखील पद्मशाली पर्यंतच्या चौकास | माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा चौक |

उपरोक्त कामी प्रस्ताव मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजूरी करिता सादर करण्यांत आला असता, सदर प्रस्तावास शहर अभियंता, अति-आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दि. / /२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकिय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव क्र. 624 दिनांक :- 26/9 /२०२५

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर येथील साईनाथ ट्रान्सपोर्ट ते अखिल पद्मशाली हॉल पर्यंत मार्गास माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग या नाकरणास अ.क्र.३ अन्वये ठराव क्र.५१० दि.०६/०९/२०२४ अन्वये मान्यता प्राप्त झाली होती. मंजूर ठरावामधील प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर येथील साईनाथ ट्रान्सपोर्ट ते अखिल पद्मशाली हॉल पर्यंत मार्गास माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा मार्ग असा नामकरण ठराव मंजूर करण्यात आलेला होता. सदर ठराव मध्यें अ.क्र.३ मध्ये बदल करुन खाली प्रामणे नामकरण नावामध्ये दुरुस्ती सुचविलेली आहे.

| अ.क्र. | नामकरणाचे ठिकाण | नामकरणाचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ क मधील पद्मानगर येथील साईनाथ ट्रान्सपोर्ट ते आखील पद्मशाली पर्यंतच्या चौकास | माजी नगरसेवक कै.नरसप्पा रामय्या कोंडा चौक |

कृ.मागे पहा

उपरोक्त कामी नामकरण ठरावामध्ये दुरुस्ती करणेकामीचा प्रस्ताव मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजूरी करिता सादर करण्यांत आला असता, सदर प्रस्तावास शहर अभियंता, अति-आयुक्त यांनी केलेल्या शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्याच अधिकारानुसार मी अजय वि.वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद कामांचे प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वि. वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय — प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते पेव्हरब्लॉकने दुरुस्ती करणे.करीता रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा़ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि.१०/०१/२०२५ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम (रक्कम लाखात) | दि. १०/०१/२०२५ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ते व पदपथ दुरुस्ती | रु. ७४२.०७ लक्ष | रु. ७४१.७९ लक्ष | रु.०.२८ लक्ष | |
| | एकूण | रु. ७४२.०७ लक्ष | रु. ७४१.७९ लक्ष | रु.०.२८ लक्ष | |

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामधील निधी संपलेला आहे. विषयांकीत काम हे रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित आहे. कामाचे अंदाजपत्रक रु.१९,९८,७३४/- इतक्या रक्कमेचे असून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.१७.८८० टक्के कमी दराने करणेत आले असल्यामुळे रु.१६,४१,३६०/- इतक्या रक्कमेत काम करणेची तयारी ठेकेदार यांनी दर्शविली आहे.मात्र सदर काम करीत असतांना काम जास्तीचे झाल्यामुळे १० टक्के वाढीव रक्कमेच्या मर्यादेत केलेले आहे. त्यामुळे कामाचे मुल्य रु.१.९७ लक्ष ने वाढलेले असल्यामुळे कनिष्ठ अभियंता यांनी वाढीव रक्कमेचे देयक सादर केलेले आहे. वाढीव रक्कमेकरीता मा. प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांनी पुनर्विनियोजन करणेकामी दि०६/०१/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच वाढीव रक्कमेचे अशीच दोन देयकाची प्रकरणे प्रलंबीत असल्यामुळे त्याला देखील वाढीव निधीची आवश्यकता भासणार आहे. तरी खालील कामाकरीता बांधकाम विभागाकडील "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधुन वाढीव रक्कमेसह रु. ६.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते पेव्हरब्लॉकने दुरुस्ती करणे. | रु.१.९७ /- लक्ष | रु.१.९७ लक्ष + रु.४.०३ लक्ष (वाढीव) असे एकूण ६.०० लक्ष निधीचे पुनर्विनियोजन |
| एकूण | रु.१.९७/- लक्ष | |

खालील लेखाशिर्षामधून पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि. १०/०१/२०२५ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. १०/०१/२०२५ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात) | पुर्नविनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| | स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा | रु.१००.०० लक्ष | रु.५३.९९ लक्ष | रु.४६.०१ लक्ष | रु.७.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त साो. यांच्याकडे निहीत आहेत.

प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते पेव्हरब्लॉकने दुरुस्ती करणे. विषयांकित कामाचे वाढीव देयक रु.१.९७/- लक्ष रक्कमेकरीता ठेकेदार यांचे पुर्ण रक्कमेचे देयक अदा करता आले नाही, रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखा मध्ये निधी शिल्लक नसल्याने देयक प्रलंबित आहे. पुर्नविनियोजन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त साो. यांनी पुर्नविनियोजन करणेस दि.०६/०१/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच वाढीव रक्कमेचे अशीच दोन प्रकरणे प्रलंबीत असल्यामुळे त्याला देखील वाढीव निधीची आवश्यकता भासणार आहे. त्या अनुषंगाने रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधून रु.६.०० लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक २३/०१/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. 1026 दिनांक 28/१/२०२५

प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते पेव्हरब्लॉकने दुरुस्ती करणे. विषयांकीत काम हे रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित होते. कामाचे अंदाजपत्रक रु.१९,९८,७३४/- इतक्या रक्कमेचे असून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.१७.८८० टक्के कमी दराने करणेत आले असल्यामुळे रु.१६,४१,३६०/- इतक्या रक्कमेत काम करणेची तयारी ठेकेदार यांनी दर्शविली आहे.मात्र सदर काम करीत असतांना काम जास्तीचे झाल्यामुळे १० टक्के वाढीव रक्कमेच्या मर्यादेत केलेले आहे. त्यामुळे कामाचे मुल्य रु.१.९७ लक्ष ने वाढलेले असल्यामुळे कनिष्ठ अभियंता यांनी वाढीव रक्कमेचे देयक सादर केलेले आहे. रस्ते व पदपथ या लेखामध्ये निधी शिल्लक नसल्याने सदर लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणे गरजेचे आहे. तसेच वाढीव रक्कमेचे अशीच दोन प्रकरणे प्रलंबीत असल्यामुळे त्याला देखील वाढीव निधीची आवश्यकता भासणार आहे. त्या अनुषंगाने रस्ते व पदपथ दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधून रु.६.०० लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून, रस्ते व पदपथ या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधून एकूण रु. ६.०० लक्ष निधीचे पुर्नविनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय — वार्ड क्र.०८ प्रभाग समिती क्र.०५ अंतर्गत कणेरी मध्ये असणारे शौचालय तोडून नवीन बांधणे बाबत.करीता स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा़ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि.८/०१/२०२५ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम (रक्कम लाखात) | दि. ८/०१/२०२५ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) | रु. ९७१.०० लक्ष | रु. ९७१.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | |
| | एकूण | रु. ९७१.०० लक्ष | रु. ९७१.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | |

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामधील निधी पुर्णपणे संपलेला आहे. विषयांकीत काम हे स्वच्छ भारत अभियान या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित होते. कामाचे अंदाजपत्रक रु.१९,९८,५७६/- इतक्या रक्कमेचे असून त्यापैकी अंतिम देयक रु.६,४०,३७८/- इतक्या रक्कमेचे निधी अभावी प्रलंबीत आहे. मात्र सदर लेखाशिर्षामधील निधी शासनाकडे पाठविला गेला असल्यामूळे देयक अदा करणेकामी सदर लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नाही. सबब बांधकाम विभागामधून निधीचे पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध करणेबाबत मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांनी दिनांक ०६/०१/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी खालील कामाकरीता बांधकाम विभागाकडील "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधुन रु. ७.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|
| वार्ड क्र.०८ प्रभाग समिती क्र.०५ अंतर्गत कणेरी मध्ये असणारे शौचालय तोडून नवीन बांधणे बाबत. | रु.६,४०,३७८/- | अंतिम देयक |
| एकूण | रु.६,४०,३७८/- | |

खालील लेखाशिर्षामधून पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि. ८/०१/२०२५ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. ८/०१/२०२५ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात) | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| | स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा | रु.१००.०० लक्ष | रु.४७.९९ लक्ष | रु.५२.०१ लक्ष | रु.७.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा◌ो. यांच्याकडे निहीत आहेत.

वार्ड क्र.०८ प्रभाग समिती क्र.०५ अंतर्गत कणेरी मध्ये असणारे शौचालय तोडून नवीन बांधणे बाबत. विषयांकित कामाचे देयक रु.६,४०,३७८/-अदा करावयाचे असून निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे पुर्नविनियोजन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सा◌ो. यांनी पुर्नविनियोजन करणेस दि.०६/०१/२०२५ रोजी मान्यता दिलेले आहेत. त्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षामधून रु.७.०० लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक / /२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. 626 दिनांक 26/१/२०२५

वार्ड क्र.०८ प्रभाग समिती क्र.०५ अंतर्गत कणेरी मध्ये असणारे शौचालय तोडून नवीन बांधणे बाबत. विषयांकीत काम हे स्वच्छ भारत अभियान या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित होते. कामाचे अंदाजपत्रक रु.१९,९८,५७६/- इतक्या रक्कमेचे असून त्यापैकी अंतिम देयक रु.६,४०,३७८/- इतक्या रक्कमेचे निधी अभावी प्रलंबीत आहे. मात्र सदर लेखाशिर्षामधील निधी शासनाकडे पाठविला गेला असल्यामूळे देयक अदा करणेकामी सदर लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नाही. स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नाही. सदर लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणे गरजेचे आहे. तरी स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधून एकूण रु. ७.०० लक्ष निधीचे पुर्नविनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १ | महसुली खर्च भाग-२ | ड-२/१८ स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा | सन २०२४-२५ करीता रु.१००.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.४७.९९ लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.५२.०१ लक्ष | महसुली खर्च भाग-१ | स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) | सन २०२४-२५ करीता रु.९७१.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.९७१.०० लक्ष | रु.७.०० लक्ष | स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा या लेखाशिर्षामधुन रु.७.०० लक्ष रुपयाचे आरोग्य विभागाकडील स्वच्छ भारत अभियान (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षा मध्ये पुर्नविनियोजनाने निधी वर्ग करणेत येत आहेत. |
| | | एकूण | | | | | | | | रु.७.०० लक्ष | |

टिपणीत नमूद केल्यानुसार.

शहर अभियंता
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

अति. आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा